| MHLA160005092017 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २५/०९/२०१७. | | |
| | नोंदणी दिनांक | : | २५/०९/२०१७. | | |
| | निकाल दिनांक | : | ०६/०७/२०२६. | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०८ | ०९ | ११ |
| | निशाणी क्र. | : | **१०१** | | |

**भाग 'अ'**

( पॅरा ४४ (i) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | | |
|---|---|---|
| | | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवणी यांचे न्यायालयात**<br>**पिठासीन अधिकारी : श.अ. सुरजुसे**<br>**–:: संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११६/२०१७ ::–** |
| | | **पहिली खबर अहवाल क्र.२६/२०१७.**<br>**पोलीस ठाणे, देवणी, ता. देवणी, जि. लातूर.** |
| **अभियोग पक्ष** | : | **महाराष्ट्र शासनातर्फे :**<br>पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे,<br>देवणी ता. देवणी जि. लातूर. |
| **अभियोग पक्षातर्फे** | : | साहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री. एस.एम. हाशमी. |
| **आरोपी** | : | **प्रताप बापूराव नादरगे,**<br>वय : ३५ वर्षे, धंदा : वाहनचालक,<br>रा. कमलवाडी, ता. देवणी जि. लातूर. |
| **आरोपीतर्फे वकील** | : | श्री. एम. एस. बिराजदार व श्री. एस. एम. बिराजदार. |

**भाग 'ब'**

( पॅरा ४४ (ii) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २१/०१/२०१७. |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २७/०१/२०१७. |
| दोषारोप पत्राची तारीख | २५/०९/२०१७. |
| दोषारोप निश्चितीची तारीख | ०६/१२/२०१७. |
| सुनावणी प्रारंभ तारीख | ०३/०७/२०२५. |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | ०६/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०७/२०२६. |
| शिक्षा झाल्यास, शिक्षा सुनावणीची तारीख | -- |

## आरोपी तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनाची तारीख | अपराध दोषारोप | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे सुनावणी दरम्यान न्याय बंदीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रताप बापुराव नादरगे | ०३/०२/२०१७ | ०३/०२/२०१७ | भा.द.वी.चे कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.का. कलम १८४,३/१८१,१४६/१९६, १३४/१७७ अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

**टीप –** फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI चे परिच्छेद क्र.४४(iii) प्रमाणे अभियोग पक्षाने सादर केलेले तोंडी आणि लेखी पुरावे हे भाग 'क' मध्ये दाखविलेले असून ते न्यायनिर्णयाच्या शेवटी जोडलेले आहे.

## –:: न्या य नि र्ण य ::–

## { दिनांक ०६/०७/२०२६ रोजी पारीत }

सदरचा खटला भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४, ३/१८१, १४६/१९६ व १३४/१७७ च्या गुन्ह्याकरिता आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात कथन खालीलप्रमाणे** :–

**०२.** दि.२१.०१.२०१७ रोजी, दुपारी १ वाजता, खबरी साधुराम शेरीबा

माने आणि मुलगा दशरथ साधुराम माने हे शेताकडे जात असताना कोनाळी गावाबाहेरील डीपी समोर १०० मीटर अंतरावर आरोपीने मोटरसायकल क्र. एम.एच. –२४–डब्ल्यू–३९४२ ही भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालविली आणि खबरीला पाठीमागून जोराची धडक दिली त्यामुळे खबरीच्या डाव्या पायाच्या मांडीचे हाड व डावा हात मोडले आणि इतर ठिकाणी मुका मार लागला. दशरथने खबरीला सावरले. आरोपी तेथून पळून गेला. दशरथने खबरीला अनिल माधव मानेच्या ऑटोरिक्षाने सरकारी दवाखाना उदगीर येथे उपचाराकरिता नेले. त्यानंतर खबरीने जय संतोषी माँ ॲक्सिडेंट हॉस्पिटल उदगीर येथे उपचार घेतला.

**०३.** पोलीस हवालदार श्री. एस. आर. चोले यांनी दि.२५.०१.२०१७ रोजी जय संतोषी माँ ॲक्सिडेंट हॉस्पिटल येथे खबरी वजा जखमीचा जबाब नोंदविला आणि त्यानंतर पोलीस ठाणे देवणी येथे दि.२७.०१.२०१७ रोजी प्रथम खबर अहवाल नोंदविला आणि आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ करिता गुन्हा क्र.२६/२०१७ दाखल केला.

**०४.** पोलीस नाईक लक्ष्मण विठ्ठलराव नागरगोजे यांनी दि.२७/०१/२०१७ रोजी साक्षीदारांसमक्ष घटनास्थळी पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, मोटरसायकल ताब्यात घेतली आणि बंधपत्रावर आरोपीला परत केली. त्यांनी आरोपीला दि. २७/०१/२०१७ रोजी अटक केली आणि पोलीस ठाणे अधिकारी यांनी आरोपीस त्याच दिवशी जामिनावर सोडले. पोलीस ठाणे अधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १७३ प्रमाणे आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४, १३४ च्या भंगाकरिता कलम १७७, ३ च्या भंगाकरिता कलम १८१ व १४६ च्या भंगाकरिता कलम १९६ च्या गुन्ह्याकरिता दोषारोपपत्र

दाखल केले.

**०५.** तत्कालीन न्यायदंडाधिकारी यांनी संक्षिप्त संपरिक्षेच्या अधिकाराच्या अभावी वॉरंट संपरिक्षेचा अवलंब केला आणि भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४, ३/१८१, १३४/१७७ व १४६/१९६ च्या गुन्ह्याचे दोषारोप (नि.३२) आणि आरोपीचे निवेदन (नि.३३) नोंदविले. आरोपीने गुन्हा नाकबूल करून संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने साक्षीदारांची साक्ष नोंदविली. मी आरोपीला गुन्ह्यात गुंतवणारा पुरावा वाचून दाखविला आणि फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) तथा भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ३५१(१) (ब) प्रमाणे त्यांचा जबाब (नि.९५) नोंदविला. आरोपीने खोट्या खटल्यात गुंतविल्याचा बचाव घेतला. सदर बचाव हा आरोपीचा जबाब आणि उलटतपास घेण्याची पद्धत यावरून ग्राह्य धरला.

**०६.** मी उपलब्ध अभिलेख आणि युक्तिवाद यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरून माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. मी त्यावर माझे निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे :–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, दि. २१/०१/२०१७ रोजी १३.०० वाजता कोनाळी येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने मोटरसायकल क्र.एम.एच.–२४–डब्ल्यू–३९४२ ही भरधाव वेगाने किंवा निष्काळजीपणे किंवा हयगयीने मानवी जीवितास धोका निर्माण होईल किंवा इतरांना दुखापत होईल या पद्धतीत चालविली आणि भारतीय दंड विधानाचे कलम २७९ प्रमाणे गुन्हा केला ? | : | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने सदर मोटरसायकल ही | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | हयगयीने किंवा भरधाव वेगाने किंवा निष्काळजीपणे मानवी जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीत चालवून खबरीला दुखापत केली आणि भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ प्रमाणे गुन्हा केला ? | : | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने सदर मोटरसायकल ही हयगयीने किंवा भरधाव वेगाने किंवा निष्काळजीपणे चालवून खबरीला गंभीर दुखापत केली आणि भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ प्रमाणे गुन्हा केला ? | | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने सदर मोटरसायकल भरधाव वेगाने किंवा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून धोकादायकपणे चालविली व खबरीला दुखापत केली आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केला? | : | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने सदर मोटरसायकल विनापरवाना सार्वजनिक रस्त्यावर चालविली व मोटर वाहन अधिनियमाचे कलम ३ चा भंग केला आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केला ? | : | नाही. |
| ६. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने विमा न काढता सदर मोटरसायकल सार्वजनिक रस्त्यावर चालविली व मोटर वाहन अधिनियमाचे कलम १४६ चा भंग केला आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १९६ प्रमाणे गुन्हा केला ? | | नाही. |
| ७. | अभियोग पक्षाने सिद्ध केले काय की, उपरोक्त दिवशी, स्थळी व वेळी आरोपीने अपघात केल्यानंतर त्याची माहिती पोलीस ठाण्यास न देता पळून गेला व मोटर वाहन अधिनियमाचे कलम १३४ चा भंग केला आणि | | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | मोटर वाहन अधिनियमाचे कलम १७७ प्रमाणे गुन्हा केला ? | | |
| ८. | काय आदेश? .........अंतिम आदेशाप्रमाणे. | | |

– **का र ण मी मां सा** –

**०७.** अभियोग पक्षाकरिता विद्वान साहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी युक्तिवादामध्ये प्रकरण आणि पुरावा यांचे वाचन केले आणि साक्षीदारांच्या साक्षीवरून आणि बचाव पक्षाने कबूल केलेल्या स्थितीवरून उपरोक्त गुन्हे सिद्ध झाले असा युक्तिवाद केला. त्यांनी आरोपीला दोषी ठरविण्याची विनंती केली.

**०८.** बचाव पक्षाचे विद्वान अधिवक्ता श्री. एस. एम. बिराजदार यांनी सुद्धा युक्तिवादामध्ये पुराव्याचे वाचन केले आणि साक्षीदारांच्या साक्षीमधील त्रुट्या दर्शविल्या. त्याप्रमाणे साक्षीदारांनी विसंगत कथन केल्याने त्यांची साक्ष विश्वासपात्र नाहीत. आरोपीच्या कृतीबाबत ठोस पुरावा उपलब्ध नाही. आरोपी हा ठोस पुराव्याअभावी आणि संशयाच्या लाभात निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यांनी आरोपीला निर्दोष करण्याची विनंती केली.

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :–**

**०९.** उपरोक्त मुद्दे हे एकमेकांशी संबंधित असल्याने आणि मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांना एकाच वेळी चर्चेकरिता घेतलेले आहेत.

**१०.** दशरथ (अ.सा.क्र.१) च्या कथनाप्रमाणे दि.२१.०१.२०१७ रोजी, दुपारी ०१.०० वाजता, गावाबाहेरील डीपीजवळ, आरोपीने मोटरसायकल क्र. एमएच २४ डब्ल्यू ३९४२ चालवून वडील साधुरामला धडक दिली, साधुरामचा डावा पाय व डावा हात मोडले होते. त्यांनी उदगीर येथील दवाखान्यात उपचार

घेतला. त्यांनी उलटतपासामध्ये कबूल केले की, अपघाताचे ठिकाण देवणी ते उदगीर रस्त्यावरील आहे, तेथे वाहनांची वर्दळ असते व नेहमी लोक हजर असतात. गावातील लोकांनी घटना बघितलेली नाही. त्यांनी केवळ नुकसानभरपाई मिळण्यासाठी साक्ष दिली आणि आरोपीने साधुरामला धडक दिली नसल्याच्या सूचना त्यांनी नाकारल्या.

**११.** ग्यानोबा (अ.सा.क्र२) च्या कथनाप्रमाणे दि.२१/०१/२०१७ रोजी, दुपारी ०१.०० वाजता, कोनाळी येथील डीपीजवळ, आरोपीने त्यांचे वडील साधुराम यांना धडक दिली व त्यांचा डावा पाय आणि हात मोडला होता. त्यांनी दवाखान्यामध्ये उपचार घेतला. त्यांनी उलटतपासामध्ये कथन केले की, त्यांनी अपघात प्रत्यक्ष बघितलेला नाही. दशरथ आणि नामदेव यांनी फोन करून त्यास घटनास्थळी बोलावले.

**१२.** लक्ष्मण (अ.सा.क्र.५) च्या कथनाप्रमाणे दि. २७.०१.२०१७ रोजी, त्यांना गुन्ह्याच्या तपासामध्ये खबर व दवाखान्याची कागदपत्रे मिळाली, त्यांनी घटनास्थळी पंचासमक्ष पंचनामा (नि.८७) तयार केला. आरोपीने निष्काळजीपणे व हयगयीपणे वाहन चालवून फिर्यादीला धडक दिली आणि गंभीर जखमी केले असे तपासात निष्पन्न झाले. त्यांनी उलटतपासामध्ये साक्षीदार दशरथ, नामदेव, ग्यानोबा ही साधुरामची मुले आणि सुकुमार ही साधुरामची सुन असल्याचे, रामेश्वर व लक्ष्मीकांत हे साधुरामचे पुतणे असल्याचे, घटनास्थळ कोनाळी ते देवणी या सार्वजनिक रस्त्यावर असल्याचे, तेथे नेहमी वाहनांची वर्दळ असल्याचे कबूल केलेले आहे. त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये पंचनामा केल्याच्या सूचना नाकारल्या.

**१३.** लक्ष्मीकांत (अ.सा.क्र.४) च्या कथनाप्रमाणे दि.२७.०१.२०१७ रोजी, सायंकाळी ५ वाजता, कोनाळी गावाच्या डीपीजवळ पोलिसांनी घटनास्थळ

दाखविले आणि त्याच्यासमक्ष पंचनामा (नि.८७) तयार केला. त्या वेळी दशरथ, रामेश्वर तुकाराम माने हे हजर होते. त्यांनी उलटतपासामध्ये कथन केले की, दशरथ चुलते असुन रामेश्वर भाऊ आहे. त्यांनी घटनास्थळी पंचनाम्याच्या वेळी हजर नसल्याच्या सूचना नाकारल्या.

**१४.** रामेश्वर (अ.सा.क्र.३) च्या कथनाप्रमाणे दि. २२.०१.२०१७ रोजी सायंकाळी ५ ते ५.३० वाजता, कोनाळी ते देवणी रस्त्यावर डीपीजवळ दशरथने घटनास्थळ दाखविले आणि पोलिसांनी त्याच्या आणि शिवकुमार मानेच्या समक्ष पंचनामा (नि.८७) तयार केला. त्यांनी उलटतपासामध्ये कथन केले की, दशरथ, ग्यानोबा व नामदेव हे चुलत भाऊ आहेत, लक्ष्मण सख्खा भाऊ आहे. लक्ष्मण पंचनाम्याच्या वेळी हजर नव्हता. त्याच्यासमक्ष घटनास्थळी पंचनामा झाला नाही हे त्यांनी नाकारले.

**१५.** मी सदर पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. आरोपीने नमूद अपघातामधील त्याचा सहभाग वजा दोष आणि गुन्हा केल्याचे नाकारलेले आहे. अभियोग पक्षाने नमूद अपघातातील आरोपीचा सहभाग वजा दोष, निष्काळजीपणा किंवा हयगयीपणा, धोकादायकपणा, भरधाव वेगाने किंवा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालविण्याची स्थिती संशयापार सिद्ध करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण हे परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित आहे. त्यामुळे अभियोग पक्षाने प्रत्येक स्थितीची शृंखला सिद्ध करणे आवश्यक आहे. त्याकरिता साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे.

**१६.** दशरथ, ग्यानोबा आणि तपास अधिकारी लक्ष्मण हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यांची साक्ष इतरांच्या माहितीवर अवलंबून आहे. परंतु दशरथ व ग्यानोबा यांनी सदर माहितीचा स्त्रोत कथन केलेला नाही. त्याचप्रमाणे

त्यांनी आरोपीला मोटरसायकल चालविताना बघितलेले नाही. आरोपी हा त्यांच्या ओळखीचा नाही. त्यामुळे त्यांची आरोपीच्या ओळखीची आणि अपघाताची साक्ष विश्वासपात्र नाही. तसेच लक्ष्मणची साक्ष मत प्रदर्शित करणारी आहे. ती गुन्ह्यासंबंधी सबळ आणि पुरेशी नाही. त्या आधारे गुन्हा सिद्ध होऊ शकत नाही.

**१७.** खबरी वजा जखमी साधुराम हा मयत आहे. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने दर्शविलेला प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नामदेव हे सुद्धा मयत आहेत. त्यामुळे त्यांची साक्ष उपलब्ध झाली नाही. यथास्थितीत, नमूद घटनेबाबत प्रत्यक्ष साक्ष उपलब्ध नाही. अभियोग पक्षाने पोलीस हवालदार श्री. एस. आर. चोले यांना न तपासल्यामुळे खबरची नोंदणी सिद्ध झालेली नाही. त्याचप्रमाणे नमूद घटनेच्या खबरचा जनक आणि प्रत्यक्ष साक्ष उपलब्ध नसल्याने ती सिद्ध झालेली नाही. त्यामुळे त्यामधील नमूद घटना आणि मजकूर ही पुरावा म्हणून वाचता येणार नाही.

**१८.** उपलब्ध पुराव्याप्रमाणे घटना दि. २१.०७.२०१७ रोजी घडली. त्या वेळी साधुरामच्या सर्व मुलांना त्याबाबत माहिती झाली. परंतु त्यांनी लगेच त्याबाबत पोलीस ठाण्यामध्ये खबर दिलेली नाही. साक्षीदारांनी किंवा अभियोग पक्षाने झालेल्या विलंबासंबंधी कारण दिलेले नाही. सदर विलंबाचे कारण अस्पष्ट आहे.

**१९.** बचाव पक्षाने लक्ष्मणची पंचनामा (नि.८७) बाबतची साक्ष खोडलेली नाही. तो पंचनाम्याचा जनक आहे. त्याप्रमाणे पंचनामा सिद्ध झाला. लक्ष्मीकांत हा फक्त खबरी आणि साक्षीदाराचा नातेवाईक असल्याच्या कारणावरून त्याची साक्षीवर अविश्वास दाखविणे अयोग्य होईल. बचाव पक्षाने त्यांच्या साक्षीवर अविश्वास दाखवण्यासाठी कोणतेही सबळ कारण दिलेले नाही. यथास्थितीत, त्याने अभियोग पक्षाला दुजोरा दिलेला आहे.

२०. रामेश्वरने पंचनाम्याची तारीख ही विसंगत कथन केली. त्यामुळे तो दि.२७.०१.२०१७ रोजी पंचनाम्याच्यावेळी घटनास्थळी हजर असल्याचे संशयास्पद आहे. रामेश्वरची साक्ष ही विश्वासपात्र नाही.

२१. घटनास्थळ पंचनामा (नि.८७) चे काळजीपूर्वक अवलोकन केले असता तो घटनेनंतर ६ दिवसांनी तयार केलेला आहे. त्यामुळे घटनास्थळी अपघाताच्या अनुषंगाने उपयुक्त परिस्थितिजन्य पुरावे वजा निशाण आढळून आलेले नाही. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, घटनास्थळ पंचनाम्यातील घटनेच्या अनुषंगाने नमूद असलेला मजकूर हा उपरोक्त वाद स्थितीचा प्रत्यक्ष आणि ठोस पुरावा नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकाऱ्याला न तपासल्यामुळे साधुरामच्या दुखापतीत आणि त्याचे स्वरूप सिद्ध झालेले नाही.

२२. आरोपीने भरधाव वेगाने किंवा निष्काळजीपणे किंवा हयगयीपणे किंवा रस्त्याच्या पलीकडे दुर्लक्ष करून मोटरसायकल चालविल्याबाबत परिस्थिती किंवा प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध नाही. घटनास्थळ पंचनाम्यामध्ये घटनेच्या अनुषंगाने म्हणजे भरधाव वेग, निष्काळजी किंवा हयगयीपणा किंवा धोकादायकपणा इत्यादीची परिस्थिती आढळून आलेली नाही. अभियोग पक्षाने मोटरसायकल तपासणी व त्याचा अहवाल सिद्ध केलेले नाहीत.

२३. उपरोक्त चर्चेवरून, मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो की, नमूद दिवशी स्थळी व वेळी आरोपीने निष्काळजीपणे किंवा धोकादायकपणे किंवा हयगयपणे किंवा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून नमूद मोटरसायकल चालविली व अपघात केला हे सिद्ध झालेले नाही. आरोपी हा साधुरामच्या दुखापतीस कारणीभूत असल्याचे सिद्ध झालेले नाही. उपरोक्त घटनेतील आरोपीचा दोष हा संशयास्पद आहे. भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७ व ३३८ चे महत्त्वाचे घटक सिद्ध

झालेले नाहीत. त्यामुळे उपरोक्त गुन्हे आणि त्यामधील आरोपीचा दोष हे संशयास्पद आहेत. सबब विचारार्थ मुद्दा क्र.१ ते ३ यांना नकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.४ ते ७ करीता : –**

२४. उपरोक्त मुद्दे हे एकमेकांशी संबंधित असल्याने आणि मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांना एकाच वेळी चर्चेकरिता घेतलेले आहेत.

२५. उपरोक्त चर्चेप्रमाणे आरोपीने हयगयीपणे किंवा निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने किंवा धोकादायकपणे मोटरसायकल चालविली हे सिद्ध झालेले नाही. त्याचप्रमाणे तपास अधिकाऱ्याने आरोपीला मोटर वाहन अधिनियमाचे कलम २०९ प्रमाणे सूचनापत्र दिलेले नाही. सबब आरोपीला मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४ करिता दोषी ठरविता येणार नाही.

२६. त्याचप्रमाणे आरोपीने अपघात करून त्याची माहिती पोलीस ठाण्याला दिली नाही, आरोपीने विनापरवाना आणि विमा न काढता मोटरसायकल चालविल्याबाबत तिळमात्र पुरावा उपलब्ध नाही. उपरोक्त साक्षीदारांनी सदर स्थितीच्या अनुषंगाने साक्ष दिलेली नाही. सदरची स्थिती गृहीत धरता येणार नाही. अभियोग पक्ष उपरोक्त गुन्हे सिद्ध करण्यासाठी अयशस्वी झाला. सबब मी विचारार्थ मुद्दा क्र.४ ते ७ यांना नकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.८ करीता : –**

२७. उपरोक्त चर्चेप्रमाणे आरोपीविरुध्द नमूद गुन्हे सिद्ध झालेले नाहीत. सबब, आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७अ प्रमाणे जामिनाची पूर्तता केलेली नाही. तपास अधिकाऱ्याने यापूर्वी मोटरसायकल बंधपत्रावर सोडलेली आहे. त्यामुळे त्याबाबत पुन्हा आदेशाची

आवश्यकता नाही. सबब, मुद्दा क्र.८ च्या उत्तरामध्ये मी खालील आदेश पारीत करतो.

**–: आ दे श :–**

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे आरोपीस भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमाचे कलम १८४, कलम ३ च्या भंगाकरिता कलम १८१, कलम १४६ च्या भंगाकरिता कलम १९६ आणि कलम १३४ च्या भंगाकरिता कलम १७७ च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जुने जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे जामिनाची पूर्तता करावी.

४. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास आरोपीने मोटरसायकलच्या अंतरिम ताब्यासंबंधी दिलेले बंधपत्र रद्द होईल.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखित व घोषित करण्यात आला.

**दिनांक :– ०६/०७/२०२६.**
**स्थळ :– देवणी**

**(शरद अ. सुरजुसे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

**परिशिष्ट**
**भाग 'क'**

( पॅरा ४४ (iii) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदार यादी**

**अ.अभियोग पक्ष –**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | दशरथ साधुराम माने | साक्षीदार |
| सा.क्र.०२ | ग्यानोबा साधुराम माने | साक्षीदार |
| सा.क्र.०३ | रामेश्वर तुकाराम माने | पंच साक्षीदार |
| सा.क्र.०४ | लक्ष्मीकांत तुकाराम माने | पंच साक्षीदार |
| सा.क्र.०५ | लक्ष्मण विठ्ठलराव नागरगोजे | तपास अधिकारी |

**ब. बचाव पक्ष साक्षीदार, असेल तर – निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर – निरंक**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ.अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | ८७ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव – निरंक**

**क. न्यायालयीन निशाणी – निरंक**

**ड. साहित्य वस्तू –**

| अ.क्र. | मुद्देमालाचा तपशील | निशाणी |
| --- | --- | --- |
| १. | मोटरसायकल क्र. एमएच २४ डब्ल्यू ३९४२ | निरंक |

**दिनांक :– ०६/०७/२०२६.** **(शरद अ. सुरजुसे)**
**स्थळ :– देवणी** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करते की, या PDF न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर शब्द न शब्द मूळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) लघुलेखकाचे नाव | : | श्री. एम.एन. येणगे (लघुलेखक श्रेणी–२) |
| २) न्यायालयाचे नाव | : | श्री. शरद अ. सुरजुसे,<br>न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, देवणी,<br>जि. लातूर. |